NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक २२.११.२०२६ रविवार

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे लकडगंज:—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २२.११.२०२६ चे ११.४० वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, गंगा—जमुना सिमेंट रोड, नाग मंदीर गल्ली जवळ निळ्या रंगाचे जॅकेट व जिन्स पॅन्ट घातलेला इसम शस्त्र बाळगून फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अजय राजेश फरदे वय २६ वर्षे रा. हत्ती नाला, लाकडी पूल, नवाबपूरा, कोतवाली, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. निलेश घायवट यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे मपोउपनि. सोनल शिंदे यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो. का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे वाडी:— बनावटीकरण करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी श्री. सचिन रमेश गोसावी, वय ४६ वर्षे, रा. जवाहर नगर, खार, मुंबई हे नेत्रीका कंन्सल्टींग प्रा. लि. मुंबई या कंपनीमध्ये फिल्ड ऑफीसर या पदावर कार्यरत असुन, त्यांच्या फर्मकडे कॅस्ट्रोल लिमीटेड या कंपनीचे स्वामीत्व हक्क प्राप्त आहेत. त्यांनी पोलीस ठाणे वाडी येथे येवुन कारवाई बाबत विनंती पत्र दिल्याने, वाडी पोलीसांनी दिनांक २१.११.२०२६ चे १८.३० वा. सुमारास, पोलीस ठाणे हद्दीत खडगाव रोड, सोनबा नगर, वाडी येथील दिप पेट्रोकेम येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे दुकानात आरोपी सुमित भिमराव मेश्राम वय ३९ वर्षे, रा. खडगाव रोड, वाडी, नागपूर हा हजर मिळाला. त्याने कारखाना मालक सुनिलसिंग वय ५० वर्षे, रा. वाडी, नागपूर हे असून ते बाहेरगावी गेल्याचे सांगीतले. कारखान्यात पाहणी केली असता, तेथे ऑईल पॅकेजींगचा कारखाना असल्याचे दिसून आले. फिर्यादीचे फर्म कडे स्वामीत्व असलेल्या ''कॅस्ट्रोल ॲक्टीव्ह'' आणि ''हिरो''या कंपनींच्या नावाशी/लेबलशी मिळते—जुळते प्रॉडक्ट, स्टिकर्स, झाकणे ज्यामध्ये ऑईलने भरलेल्या वेगवेगळया मिली च्या बॉटल्स, रिकाम्या बॉटल्स, झाकणे, लेबल्स, ऑईल भरलेले १४ लोखंडी बॅरल, मोटर पंप, पॅकेजींग मशीन व पॅकींग केलेल्या बॉटल्स असे साहित्य तयार करून विक्री करीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन बनावटी साहित्य एकुण किंमती अंदाजे ६,२१,८९०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपीचे हे कृत्य कलम १०३, १०४ व्यापार चिन्ह् अधिनीयम १९९९, सहकलम ५१, ६३ कॉपी राईट ॲक्ट १९५७ सहकलम ३४९ भा.न्या.सं. अन्वये होत असल्याने, फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस

ठाणे वाडी येथे सपोनि साईप्रसाद केंद्रे यांनी दोन्ही आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे अंबाझरी :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी गजानन बाबूराव बोंदरे, वय ५६ वर्षे, रा. देवनगर, बजाजनगर, नागपूर हे मा. जिल्हा विशंष लेखा परिक्षक वर्ग—१, सहकारी संस्था, गणेशपेठ येथे लेखा परिक्षक या पदावर कार्यरत आहे. मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर येथे पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील कॉफी हाऊस चौक, गोकुळ पेठ येथील धनलक्ष्मी महिला सहकारी पत संस्था मर्यादित या संस्थेकडून मुदत ठेवीच्या रकमा परत मिळत नसल्याबद्दल ०६ ठेविदारांनी तक्रार दिली असल्यामुळे फियादी यांना चाचणी लेखा परिक्षण करीता आदेश प्राप्त झाले होते. फिर्यादी यांनी पाहणी केली असता, दिनांक ०२.०९.२०२३ ते दिनांक २७.०२.२०२६ चे दरम्यान, संस्थेच्या अध्यक्षा आरोपी श्रीमती रूपाली विनोद मोरे यांनी त्यांचे पदाचा गैर फयदा घेवून ठेवीदारांना त्यांची रक्कम मुदत ठेव करते म्हणून स्विकारल्या व ठेवीदारांना रक्कम स्विकारल्याच्या पावत्या दिल्या परंतु रक्कमा संस्थेच्या रेकॉर्डला घेतल्या नाही. त्या रक्कमा त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता वापरून संस्था व ठेवीदार यांचा अन्यायाने विश्वासघात करुन त्यांची एकुण ५४,२०,००१/—रू. ची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे पोउपनि. नानाभाऊ काकड ७०८३४५६८६४ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६(५),३१८(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

४) पोलीस ठाणे धंतोली :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २२.१.२०२६ चे ०७.२० वा. चे सुमारास, फिर्यादी विजय लक्ष्मणराव भोयर वय ७९ वर्षे, रा. लक्ष्मण अपार्टमेन्ट, साई मंदीर जवळ, वर्धा रोड, धंतोली, नागपूर हे त्यांचे परिचीत राजीव महेंद्रलाल शाह वय ५६ वर्षे रा. धनराज हाईट्स, धंतोली, नागपूर यांचेसह नेहमी प्रमाणे मॉर्निग वॉक करीता पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, अजीत बेकरीसमोर रोडवर, वर्धा रोड, येथुन पायदळ जात असता, नागपुर कडून बुट्टीबोरीकडे जाणाऱ्या हिरव्या रंगाची बस क्र. एमएच ४० डीसी ७४३२ चा चालक नामे शेख रियाज शेख चॉद कुरेशी वय ३९ वर्षे रा. पिटेसुर वस्ती, मस्जीदजवळ, गोधणी, मानकापूर, नागपूर याने त्याचे ताब्यातील बस भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन राजीव शाह यांना धडक देवून, गंभीर जखमी करून, मेट्रो स्टेशनचे पिल्लरला धडक दिली. गंभीर जखमी राजीव यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे सफौ. सुनिल शिंदे ९८२२३६२३८९ यांनी बस चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, मो. वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

५) पोलीस ठाणे वाठोडा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २०.११.२०२६ चे १६.०० वा. ते दिनांक २१.११.२०२६ चे १६.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत प्लॉट नं. ७१, शिव छत्रपतीनगर, खरबी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी विजय पुसारामजी कुकडे, वय ५५ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह कुही मांढळ येथे सासुरवाडीला गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख २,५०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने, असा एकुण किंमती ३,५५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. विक्रांत कारटवार ७२७६२०९५३६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.